**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (पुर्व),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५.**

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९०

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./०२/22**

**दिनांक : 10/01/2022.**

# आदेश

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

**विषय :-** **वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना/ २०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य-५, दि.१४ मार्च, २०२०.

४) शासन, महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दि. २७/११/२०२१, दि. २४/१२/२०२१ व दि. ३०/१२/२०२१.

५) या कार्यालयाकडील आदेश क्र. व.वि.श.म./अति.आ.(द)/६५/२१-२२, दि. २५/१२/२०२१.

६) या कार्यालयाकडील आदेश क्र. व.वि.श.म/अति.आ./६७/२१-२२, दि. ३१/१२/२०२१.

७) शासन, महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभागाकडील आदेश क्र.डीएमयु /२०२०/ सीआर.९२/डीआयएसएम-१, दि. ०८/०१/२०२२.

८) शासन, महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभागाकडील आदेश क्र. डीएमयु /२०२०/ सीआर.९२/डीआयएसएम-१, दि. ०९/०१/२०२२.

ज्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८५७ च्या कलम २ नुसार तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये प्राप्त शासन आदेशास अनुसरुन आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे निर्बंध लागू राहतील असे जाहिर केले आहे. आणि

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ४ दि. २७/११/२०२१ नुसार कोव्हीड-१९ आजारास प्रतिबंध करण्यासाठी निर्बंध लावणेसंदर्भात राज्य शासनाने तत्पुर्वीचे सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन सर्व आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व मनोरंजन क्षेत्रातील कार्यक्रमांना कोव्हीड-१९ साथरोग येण्यापूर्वीच्या विविध स्थानिक किंवा इतर सक्षम प्राधिकरणांनी ठरविलेल्या सर्वसाधारण वेळांनुसार काही विविक्षित शर्तीना अधीन राहून खुले करण्याबाबत राज्य शासनाकडून नव्याने आदेश निर्गमित करणेत आले होते.

ज्याअर्थी संदर्भ क्र. ०४ दि. २४/१२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार विवाह सोहळे, सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, संमेलन/मेळावे इत्यादींबाबत काही निर्बंध नव्याने लागू करणेत आले. सदरहू निर्बंध वसई-विरार शहर महानगरपालिका परिक्षेत्रात दि. २५/१२/२०२१ रोजीचे रात्री १.०० वाजेपासून पुढील आदेश होईपर्यंत लागू करण्यात आले आहेत.

तदृनंतर दि. ३०/१२/२०२१ रोजीचे आदेशान्वये विवाह सोहळे, सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, संमेलन/मेळावे आणि अंत्यविधीचे कार्यक्रम इत्यादींबाबत सुधारित निर्बंध लागू करणेत आले आहेत.

आता कोव्हिड -१९ चा वाढता प्रार्दुभाव विचारात घेऊन उपरोक्त संदर्भ क्र. ७ व ८ अन्वये दि. १०/०१/२०२२ पासुन सुधारित निर्बध लागु करण्यात येत आहेत.

त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका हे वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दि. १०/०१/२०२२ रोजीपासून खालील निर्बंध लागू करत असल्याचे आदेश देत आहेत.

| विभाग | प्रस्तावित निर्बंध |
| --- | --- |
| लोकांच्या हालचाली | १. सकाळी ५.०० ते रात्री ११.०० वा. पर्यंत पाच किंवा पाच पेक्षा जास्त नागरीक एकत्र येण्यावर निर्बंध<br>२. रात्री ११.०० ते स.५.०० पर्यंत अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर फिरण्यास निर्बंध. |
| शासकीय कार्यालय | १.विभाग प्रमुखाच्या स्पष्ट व लेखी परवानगीशिवाय नागरिकांच्या उपस्थितीवर निर्बंध.<br>२.विभाग प्रमुखाच्यांमार्फत नागरिकांशी ऑनलाईन प्रणालीव्दारे संवाद उपलब्धता.<br>३.मुख्यालय परिसरातील तसेच मुख्यालयात बाहेरुन बैठकीसाठी येणाऱ्याकरिता व्हिडीओ कान्फरसव्दारे संवाद साधावा.<br>४.कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत कार्यालयाच्या गरजेप्रमाणे कायालय प्रमुख वेळ बदल, वर्क फ्रॉम होम (Work From Home), कामाचे लवचिक तास याबाबत निर्णय घेतील.<br>५.विभाग प्रमुख कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक नियमावली बाबत कठोर अंमलबजावणी करतील.<br>६.सर्व विभाग प्रमुखामार्फत थर्मल स्कॅनर आणि सॅनिटायझर याची उपलब्धतेबाबत दक्षता घेतील. |
| खाजगी कार्यालय | १. कार्यालयीन व्यवस्थापन कर्मचाऱ्यांचे वर्क फ्रॉम होम (Work From Home) व्दारे कामाचे सुसुत्रीकरण करतील व कामाचे तास ठरवतील.<br>२.एकूण कर्मचाऱ्याच्या ५०% पेक्षा जास्त कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसावेत आणि यासाठी व्यवस्थापन कर्मचाऱ्यासाठी परिस्थितीनुसार कामाच्या वेळेची लवचिकता ठरवतील. तसेच शिफ्टमध्ये आणि २४ तास कार्यालय सुरु ठेवण्याबाबत नियोजन करतील.<br><br>**कार्यालयीन कामकाजासाठी प्रवास :-**<br>१. जर कार्यालय अत्यावश्यक कामासाठी अनिश्चित व कार्यालयीन वेळेशिवाय सुरु असतील तर सर्व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र पुरविण्यात येतील. सदरचे निर्णय होत असताना महिला कर्मचाऱ्यांची सुरक्षितता व सुविधा विचारात घेणे आवश्यक राहील.<br>२.केवळ पुर्ण लसीकरण झालेले कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहतील. लसीकरण न झालेल्या कर्मचाऱ्यांना लसीकरण पूर्ण करण्याबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.<br>३. कार्यालयीन व्यवस्थापनामार्फत कोव्हिड-१९ प्रतिबंधात्मक नियमावलीचे पालन कर्मचाऱ्यांमार्फत होत असल्याची खात्री करणे बंधनकारक राहील.<br>४. थर्मल स्कॅनर / सॅनिटायझर कार्यालयीन व्यवस्थापनामार्फत पुरवण्यात येईल. |

| | |
|---|---|
| लग्नसमारंभ | जास्तीत जास्त ५० व्यक्ती. |
| अंत्यविधी | जास्तीत जास्त २० व्यक्ती. |
| सामाजिक,धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रम | जास्तीत जास्त ५० व्यक्ती. |
| शाळा व महाविद्यालय/ कोचिंग क्लासेस | दि.१५/०२/२०२२ पर्यंत खालील अपवाद वगळता बंद राहतील.<br>१. विविध शैक्षणिक मंडळाव्दारे दहावी व बारावी विद्यार्थासाठी आवश्यक असणारे उपक्रम.<br>२. वर्ग खोल्यातील शिक्षणाशिवायचे प्रशासकीय उपक्रम व शिक्षकाव्दारे घेण्यात येणारे उपक्रम.<br>३. शालेय शिक्षण विभाग, कौशल्य व उद्योजकता विकास महामंडळ, तंत्र व उच्च शिक्षण मंडळ, वैद्यकिय शिक्षण मंडळ, महिला व बालकल्याण विकास मंडळ व इतर वैधानिक मंडळे यांच्यामार्फत निर्देशित करण्यात आलेले उपक्रम.<br>४.वरील सर्व विभाग व वैधानिक महामंडळे यांच्यमार्फत अत्यावश्यक कारणासाठी सुट हवी असल्यास त्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाची परवानगी आवश्यक राहील. |
| जलतरण तलाव/ स्पा / वेलनेस सेंटर | बंद राहतील. |
| व्यायामशाळा/ ब्युटी सलुन | दि. ०९/०१/२०२२ रोजीच्या शासनाच्या आदेशानुसार ब्युटी सलुन व व्यायामशाळा हे ५०% उपस्थितीत सुरु राहतील. मास्क वापरणे बंधनकारक राहील. केवळ पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीना प्रवेश राहील. |
| केशकर्तनालय | १. ५०% उपस्थिती.<br>२. दररोज रात्री १०.०० ते स. ७.०० या वेळेत बंद राहतील.<br>३.केशकर्तनालयातील इतर सुविधा बंद राहतील.<br>४. मास्क वापरणे बंधनकारक राहील. केवळ पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीना प्रवेश राहील. |
| खेळ व खेळांच्या स्पर्धा | अ). केवळ राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय दर्जाच्या पूर्वनियोजित स्पर्धेसाठी परवानगी राहील. त्यासाठी खालील अटी राहतील.<br>१. प्रेक्षकवर्ग परवानगी नाही.<br>२.सर्व कर्मचारी व खेळाडु यांच्यासाठी बायो-बबल आवश्यक .<br>३. सर्व आतंरराष्ट्रीय खेळासाठी केंद्रशासनाची नियमावली सर्व सहभागी देशी व विदेशी खेळाडुंना पाळणे बंधनकारक.<br>४. RTPCR / RAT दर तिसऱ्या दिवशी खेळाडु व कर्मचाऱ्याने करुन घेणे आवश्यक.<br>ब). शहर अथवा जिल्हापातळीवरील क्रीडा शिबिरे, स्पर्धा उपक्रम राबविण्यास बंदी. |
| मनोरंजन केंद्र, प्राणीसंग्राहालय, वस्तुसंग्राहालय, किल्ले व इतर टिकिट काढुन प्रवेश दण्यात येणारे सार्वजनिक ठिकाणे. स्थानिक पर्यटन स्थळे. | बंद राहतील. |
| शॉपिंग मॉल्स, व्यापारी संकुले मर्यादित प्रवेशासह | १. ५०% मर्यादा.<br>नागरिकांच्या माहितीसाठी संकुलनातील कमाल मर्यादा व प्रत्यक्ष नागरिक यांची माहिती नोटिस बोर्डवर प्रदर्शित करणे आवश्यक राहील.<br>२. कोव्हिड प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी नागरिक व कर्मचारी यांच्याकडुन होणेबाबत संबधित आस्थापना मार्शलची नेमणुक करतील.<br>३. Rapid Antigen Test तपासणी बुथ / Kiosks. |

| | |
|---|---|
| | ४. केवळ पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीलाच प्रवेश.<br>५. रात्री १०.०० ते सं. ८.०० यावेळी बंद राहतील. |
| उपहारगृहे / खाद्यगृहे | १.५०% मर्यादा.<br>नागरिकांच्या माहितीसाठी उपहारगृहे / खाद्यगृहे यातील कमाल मर्यादा व प्रत्यक्ष नागरिक यांची माहिती नोटिस बोर्डवर प्रदर्शित करणे आवश्यक राहील.<br>२. केवळ पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीलाच प्रवेश.<br>३. रात्री १०.०० ते सं. ८.०० यावेळी बंद राहतील.<br>४.सर्व दिवस होम डिलिव्हरी चालू राहील. |
| नाटयगृहे / सिनेमागृहे | १.५०% मर्यादा.<br>नागरिकांच्या माहितीसाठी नाटयगृहे / सिनेमागृहे यातील कमाल मर्यादा व प्रत्यक्ष नागरिक यांची माहिती नोटिस बोर्डवर प्रदर्शित करणे आवश्यक राहील.<br>२. केवळ पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीलाच प्रवेश.<br>३. रात्री १०.०० ते सं. ८.०० यावेळी बंद राहतील. |
| आंतरराष्ट्रीय प्रवास | केंद्रशासनाच्या निर्देशानुसार. |
| देशांतर्गत प्रवास | दुसऱ्यांदा लसीकरण किंवा राज्यात येण्यापुर्वी ७२ तास आगोदर RTPCR चाचणी करणे बंधनकारक. हे सर्व हवाई, रेल्वे व रस्त्यावरील प्रवासासाठी लागू राहील. चालक, स्वच्छता कर्मचारी व इतर अनुषांगिक कर्मचाऱ्यांसाठीही हे बंधनकारक राहील. |
| कार्गो वाहतुक /औद्योगिक उपक्रम /बांधकाम क्षेत्र | केवळ पूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीलाच लागू. |
| सार्वजनिक वाहतुक | नियमित वेळेत केवळ पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तीलाच लागु. |
| UPSC/MPSC/ संवैधानिक यंत्रणा, सार्व संस्था यांच्यामार्फत परिक्षाबाबत | १. केंद्रस्तारावरील स्पर्धा परिक्षा केंद्रशासनाच्या निर्देशानुसार घेण्यात येतील. या परिक्षेसाठी देण्यात आलेले प्रवेशपत्र अत्यावश्यक कारणासाठी प्रवास याकरिता ग्राहय धरण्यात येईल.<br>२.राज्यस्तारावरील भरविण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा परिक्षाबाबत प्रवेशपत्र देण्यात आलेल्या आणि परिक्षेची तारिख निश्चित झालेल्या परिक्षेच्या वेळापत्रकानुसार पार पडतील. पुढील इतर सर्व परिक्षा राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या मंजुरीनंतर घेण्यात येतील.<br>३. सर्व परिक्षा करोना प्रतिबंधात्मक नियमानुसार घेण्यात येतील व जिल्हा आपत्ती यंत्रणा यासाठी निरिक्षक नेमतील. |

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

उक्त आदेशांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास सर्व संबधितांवर साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ५१ ते ६० अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता, यामधील कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(मा. आयुक्त यांचे निर्देशांनुसार)**

(पंकज पाटील)
उप- आयुक्त (सा.प्र.)
वसई-विरार शहर महानगरपालिका.

**प्रत माहितीसाठी सादर :-**

१) मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ २ व ३, पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर-वसई-विरार.
२) स्विय सहायक, मा. आयुक्त व अतिरिक्तआयुक्त (उत्तर), (व दक्षिण) वसई विरार शहर महानगरपालिका.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१) उप-आयुक्त (सर्व) व उप-आयुक्त, परिमंडळ १, २,३ .
२) सहाय्यकआयुक्त/ प्र. सहा. आयुक्त (सर्व) / विभागप्रमुख (सर्व) / खातेप्रमुख (सर्व) .
३) जनसंपर्क अधिकारी यांना प्रसिध्दीसाठी.
४) आय.टी. विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.